पालि

# आलोको

## इयत्ता अकरावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास - २११६/(प्र.क्र.४३/१६)एसडी - ४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक २०.६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# पालि आलोको

## इयत्ता - अकरावी



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११००४

C4S2V2

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१९
पहिले पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**पालि भाषा तज्ज्ञ समिती**

डॉ. विमलकिर्ती, नागपूर (अध्यक्ष)
श्री. माधव मेश्राम, अंबाजोगाई (सदस्य)
श्री. अशोक पैठणे, अमरावती (सदस्य)
डॉ. संतोष भोसले, औरंगाबाद (सदस्य)
श्री. पंजाब प्रधान, उल्हासनगर (सदस्य)
डॉ. मोहन वानखडे, नागपूर (सदस्य)
श्री. किर्तीराज लोणारे, अंबाजोगाई (सदस्य)
श्री. सोपान पठाडे, यवतमाळ (सदस्य)
श्रीमती संध्या विनय उपासनी
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य सचिव)

**पालि भाषा अभ्यास गट सदस्य**

डॉ. योजना भगत
डॉ. विश्वनाथ चौरपगार
श्रीमती तृप्तीराणी तायडे
श्री. रामकृष्ण तागडे
श्रीमती विणा नकाते
श्रीमती निरुपमा भोरे
श्री. पुरुषोत्तम सिरसाठ
श्री. दिलीप सोनोने
श्री. प्रभुदास तायडे
श्री. विश्वजीत रगडे
डॉ. मनीष आनंद
डॉ. बालाजी गव्हाळे

**संयोजन**

**श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी
**श्रीमती संध्या विनय उपासनी**
सहायक विशेषाधिकारी, हिंदी

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई - २५.

**चित्रकार** : श्री. यशवंत देशमुख
**मुखपृष्ठ** : श्री. विवेकानंद पाटील
**अक्षरजुळणी** : बलदेव कंप्युटर्स, मुंबई - ४०० ०२८.
**निर्मिती** : श्री. सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
श्री. राजेंद्र पांडलोसकर, सहाय्यक निर्मिती अधिकारी
**कागद** : ७० जी. एस. एम. क्रीमवोव्ह
**मुद्रणादेश** :
**मुद्रक** :

# "भारतस्स संविधान"

## उद्देसिका

**मयं, भारतस्स लोक,** भारतस्स एको **बाहुभूमिकं**
**सङ्गणिकावादी धम्मनिरपेक्ख लोकसाही गणरज्ज** रचयतिस्स
च तस्स सब्बे नागरिकानं;
**बाहुजञ्ञ, वित्तिय, च राजनेत्तिक ञाय;**
**वितक्क अभिवेत्ति, विस्सास, सद्धा**
**च उपासना एस्स विमुत्ति;**
**दज्जस च सन्धीस्स समानत्त;**
**एकंस पापेतु कत्वानं ददातिस्स च**
**तं सब्बेस्मिं पुग्गलस्स पतिट्ठा**
**च रट्ठस्स समग्गी च सामग्गीयं**
**एस्स आन दातु बन्धूता**
पवड्ढितुं कितस्स सङ्कप्पपुब्बकं सम्मासङ्कप्प कत्वानं;

**अम्हाकं संविधान सभास्मिं**

अज्ज दिवांङ्क सव्वीसति कत्तिक, एकूनवीसति एकूनपञ्ञासति दिने
इत्थं अयं **संविधान अधिकत च अधिनियत**
कत्वान **सयं पत समप्पयाम.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे।।

## पटिञ्ञा

भारतो मम देसो ।
सब्बे च भारतीया मम बान्धवा ।
अत्थि देसविसये मे पेमं ।
मम देसस्स या समिद्धता,
या च विविधताय मण्डिता परम्परा, तस्साहं मानि ।
एतं दायज्जं उपसम्पादेतुं अहं दळ्हपरक्कमो भविस्सामि ।
अहं मातापितुन्नं च आचरियानं च पाचरियानं च
वयो–अनुप्पत्तानं सक्करिस्सामि ।
सब्बे जने अहं सोरताय पटिपज्जिस्सामि ।
अहं देसविसये देसबान्धवविसये च दळ्हभत्तिं
पटिजानामि ।
यं तेसं कल्याणं तं एव होतु मे कल्याणं,
या तेसं समिद्धि सा मे समिद्धि
यं तेसं सुखं तं मे सुखं।

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हा सर्वांचे इयत्ता अकरावीच्या वर्गात स्वागत आहे. 'पालि आलोको' हे इयत्ता अकरावीचे पालि पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आनंद होत आहे.

या पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगात डोकावल्यानंतर तुमच्या लक्षात येईल की, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या संविधानिक मूल्यांची जाणीव आपल्यामध्ये व्हावी यादृष्टीने पाठ्यघटकांची निवड करण्यात आलेली आहे. या पाठ्यपुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक पाठ्यघटकावरील स्वाध्यायांचे स्वरूप आणि त्यामधील विविधता. यामुळे पाठ्यघटकांचे अंतरंग समजून घेण्यास विशेष मदत होऊ शकते. विद्यार्थ्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि सृजनशीलता विकसित करण्याच्या उद्देशाने स्वाध्यायातील कृतींची रचना करण्यात आलेली आहे. याच दृष्टीने गद्य-पद्य पाठांची निवड करण्यात आलेली असून त्यातील रंजकता व सुलभता यावर भर देण्यात आलेला आहे. पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करताना विद्यार्थ्याला अभ्यासाचे ओझे वाटणार नाही, पाठांतराचे दडपणही राहणार नाही, अशा प्रकारची या पाठ्यपुस्तकाची रचना करण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कृतिपत्रिकेच्या माध्यमातून होणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना भाषेच्या अध्ययनाची आवड निर्माण होईल तसेच विद्यार्थ्यांची अध्ययन प्रक्रिया प्रज्ञाशीलतेने युक्त होऊन ज्ञानरचनात्मक पद्धतीने गतिमान होण्यास मदत होईल. तसेच पाठ्यपुस्तकात दिलेल्या चित्रांमधून तत्कालिन पोशाख, आभूषणे, राहणीमान, जीवनपद्धती इत्यादी बाबतची माहिती सहजतेनं होईल.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, राष्ट्रप्रेम निर्माण व्हावे, ते सदाचारी व्हावेत हा हेतू डोळ्यासमोर ठेऊनच पाठ्यघटकांची निवड करण्यात आलेली आहे. भिक्खू-भिक्खूनी संघाची संपूर्ण कार्यप्रणाली लोकशाही स्वरूपाची होती. वेगवेगळ्या कुळातून, जातीतून, धर्मातून, प्रांतातून आलेले लोक संघात प्रव्रज्जित झाल्यानंतर ते आपले सर्व भेद विसरून त्यांची केवळ 'शाक्यपुत्रीय श्रमण-श्रमणी म्हणून ओळख असायची, यामधून आपल्याला राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश मिळतो. 'चरियापिटक' या घटकातून कठिणातील कठीण कार्य करण्याचे, आपत्तीला तोंड देण्याचे, सुख-दु:खात समभावाने राहण्याचे विचार दिसून येतात. सर्वच पाठ्यघटक असे आहेत की, जे आपल्याला सुसंस्कृत आचरण करण्यास प्रेरित करतात.

पाठ्यघटकांसंबंधी माहिती मिळविण्यासाठी ॲपच्या माध्यमातून क्यू. आर. कोडद्वारे उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल. त्याचा तुम्हांला अभ्यासासाठी निश्चितपणे उपयोग होईल.

प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार करण्याच्या कामी पालि भाषा तज्ज्ञ समिती, पालि भाषा अभ्यासगट सदस्य या सर्वांनी परिश्रम घेऊन पाठ्यपुस्तक तयार केले आहे. पालि भाषेचे शिक्षक व तज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले. समीक्षकांच्या सूचना व अभिप्राय यांचा विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

भाषेच्या विकासाबरोबरच विद्यार्थ्यांची नैतिकता, विचारक्षमता, अभिव्यक्ती कौशल्य, परोपकार भावना, स्वमत प्रकटीकरण आणि राष्ट्रीय मूल्ये यांच्या विकासासाठी 'पालि आलोको' हे पुस्तक उपयुक्त ठरू शकेल. तसेच विद्यार्थी, पालक, शिक्षक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

डॉ. सुनिल मगर<br>
संचालक<br>
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व<br>
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

पुणे<br>
दिनांक :- २० जून २०१९<br>
भारतीय सौर : ३० ज्येष्ठ १९४१

## भाषाविषयक क्षमता : पालि

इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांमध्ये पालि भाषाविषयक खालील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.

| क्षेत्र | क्षमता |
|---|---|
| **श्रवण** | • पालि भाषा साहित्यातील भावार्थ समजून घेता येणे.<br>• पालि भाषा विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यांतील स्वराघात, आरोह-अवरोह या वैशिष्ट्यांची जाण होणे.<br>• पालि भाषेतील औपचारिक व अनौपचारिक संवाद व संभाषण ऐकून चिकित्सक विचारासह त्यात सहभागी होता येणे.<br>• परिसरात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलीभाषा ऐकून त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार तुलना करता येणे. |
| **भाषण** | • पालि भाषेतील उच्चार वैशिष्ट्यांना अनुसरून तिपिटकातील गाथांचे पठन आणि संभाषण करता येणे.<br>• पालि भाषेतील अध्ययन कृतींना विषयाला अनुसरून अनुभव कथन करता येणे.<br>• पालि भाषेत एकमेकांशी संभाषण करता येणे. |
| **वाचन** | • योग्य गतीने व विरामचिन्हांची दखल घेऊन प्रकट वाचन करता येणे.<br>• पालि साहित्यातील तिपिटक व अनुपिटक साहित्यप्रकारांचे वाचन करून त्याचा आस्वाद घेणे.<br>• संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या ‘ई’ साहित्याचे वाचन करून त्या माहितीचा स्वयं अध्ययनासाठी उपयोग करता येणे. |
| **लेखन** | • लेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे.<br>• भाषा नियमांना अनुसरून संवाद, वर्णन, लघुपरिच्छेद लिहिता येणे.<br>• माध्यम भाषेतील भाषा नियमाला अनुसरून अनुवाद करता येणे. |
| **अध्ययन कौशल्य** | • कोणत्याही संदर्भासाठी शब्दकोश पाहता येणे.<br>• पालि भाषेत शब्दजाळे निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.<br>• पालि भाषेत कथापूर्ती करता येणे.<br>• पालि भाषेत अनुवाद करता येणे.<br>• संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक साहित्याचा वापर अभ्यासासाठी करता येणे. |
| भाषाभ्यास | • इयत्ता दहावीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी करणे.<br>• पालि भाषेत सरळ संवाद करणे.<br>• एक ते पन्नास (१-५०) अंक (क्रम) जाणून घेणे. |

# शिक्षकांसाठी

'पालि आलोको' इयत्ता अकरावीचे हे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपणास देताना आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील कौशल्य, नैतिक मूल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या मनावर सुसंस्कार रुजवता येतील अशा पाठ्यघटकांचा यामध्ये समावेश केलेला आहे. पाठ्यघटकांमधील आशय विद्यार्थ्यांना सहजतेने स्पष्ट व्हावा यादृष्टीने आशयानुरूप पाठ्यघटकांमध्ये चित्रांचा समावेश करण्यात आलेला आहे. शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या पाठ्यपुस्तकातील कृतीबरोबरच इतर विविध कृती व उपक्रम योजून ते विद्यार्थ्यांकडून करून घ्यावेत.

गद्य-पद्य पाठ निवडतांना काही चिरंतन मूल्ये आणि तत्त्वांचा विचार करण्यात आलेला आहे. पाठ्यघटकांची माहिती व्हावी म्हणून पाठ्यघटकाआधी त्याची सारांशरूपात प्रस्तावना देण्यात आलेली आहे. ही प्रस्तावना त्या पाठ्य घटकाचे सार आहे. शिक्षकांनी ही प्रस्तावना अधिक स्पष्ट करतांना, पाठ्यघटकांशी संबंधित पालि साहित्यातील इतर संदर्भांचा सुद्धा अध्ययन-अध्यापनात समावेश व्हावा, यादृष्टीने काही पालि संदर्भ ग्रंथांची यादी पाठ्यपुस्तकात देण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांना लेखन-वाचन कौशल्य विकासासाठी पाठ्यपुस्तकातील घटकनिहाय कृती व त्यांचे नमुने दिलेले आहेत. विद्यार्थ्यांना पालि भाषा शिकण्याकरिता, शिकवण्याकरिता या कृती घटकांचा विशेष उपयोग होऊ शकतो. या वैविध्यपूर्ण कृतींमधून विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्य विकसित होणार आहेत. इयत्ता अकरावीतील लेखन घटकांची मांडणी करतांना विद्यार्थ्यांना तो सहजतेने समजेल याची दक्षता घेण्यात आलेली आहे. शिक्षकांनी प्रत्येक पाठ्यघटक विद्यार्थ्यांना समजून सांगतांना तो त्याला चांगल्या प्रकारे आकलन होईल यादृष्टीने स्वकौशल्य विकसित केल्यास विद्यार्थ्यांमध्ये पालि भाषा शिकण्याची आवड निर्माण होईल.

या पाठ्यघटकांमध्ये व्याकरण घटकांची व कृतींची मांडणी सहज, सुलभ व सोप्या पद्धतीने केली आहे. कृतिपत्रिकेमध्ये या व्याकरण घटकांवर आधारित कृतींचा समावेश केला आहे. शिक्षकांनी स्वत: या व्याकरण घटकांच्या सरावासाठी विविध कृती योजाव्यात व विद्यार्थ्यांकडून तसा सराव करून घ्यावा.

पालि भाषेचा जर आपल्याला अभ्यास करायचा असेल तर तो तीन अंगांनी करता येतो, तो म्हणजे - परियति, पटिपत्ति व पटिवेदन. परियति म्हणजे ऐकून, वाचून, शब्दाचा अर्थ समजून घेणे, पटिपत्ति म्हणजे त्यावर चर्चा करणे, विचार-विमर्ष करणे आणि पटिवेदन म्हणजे त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेणे. पालिमधील शब्दांचे असे तिन्ही अंगांनी जोपर्यंत अनुभूती येत नाही. तोपर्यंत पालि शब्दांचे संपूर्ण ज्ञान होत नाही.

पालि भाषेच्या अध्ययनाच्या दृष्टीने दुसरी महत्त्वाची बाब ही की, इतर भाषांचा अभ्यास हा गद्य, पद्य, नाटक, कथा-कथन इत्यादीपुरताच मर्यादित असतो परंतु पालि भाषेचा अभ्यास आपण वेगवेगळ्या प्रकारांनी करू शकतो. पालि भाषा ही आपल्याला नऊ अंगांनी शिकता येते. जिला 'नवाङ्गसत्थुसासन' असे सुद्धा म्हणतात. म्हणून पालि शिकण्याकरिता वेगवेगळी दालने उपलब्ध आहेत. या सर्वांचा उपयोग आपल्याला अध्यापनामध्ये निश्चित रूपाने होऊ शकतो.

पालि भाषा शिकतांना-शिकवितांना सर्वप्रथम ती भाषा काय आहे, ती आपल्याला कशा पद्धतीने समजून घेता येईल, ती बोलचालची भाषा कशी होईल? यादृष्टीने पालि भाषेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. यामध्ये शिक्षकाचे अध्ययन-अध्यापन निश्चित रूपाने दिशादर्शक ठरू शकते. कारण प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत बौद्ध संस्कृती, तत्त्वज्ञान, इतिहास, जीवन मूल्ये समजून घेण्याच्या दृष्टिने पालि भाषेचे फार महत्त्व आहे. पालि भाषेच्या या महत्त्वामुळेच आज हा विषय राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला आहे. म्हणून असे म्हणता येईल की, आधुनिक भारतात पालि भाषेच्या अध्ययनाचे क्षेत्र निश्चितच व्यापक होत आहे. यामध्ये शिक्षक म्हणून आपले योगदान या विषयाला क्रमप्राप्त आहे. म्हणून शिक्षकांनी स्वत:च्या सृजनशीलतेने, कल्पकतेने या पाठ्यघटकांचे अध्यापन करून विद्यार्थ्यांना पालि विषयाच्या अध्ययनासाठी प्रेरित करणे गरजेचे आहे. त्यातून विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता, विचारक्षमता व कृतीशीलता यांना ही गती प्राप्त होईल. शिक्षक हा केवळ पाठ्यघटकच शिकवित नसतो तर विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगीण गुणांची वाढ कशी करता येईल? त्यांच्यामधील न्यूनगंड कसा काढता येईल? त्याला समाजाभिमुख कसे करता येईल? हे मूल्य सुद्धा पाठ्यघटकाच्या अनुषंगाने शिकवणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांच्या चुकाच न दाखवता त्यांच्यामधील ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्याची स्तुती करणे ही गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्येक कृती चांगल्याप्रकारे करण्याची प्रेरणा मिळते.

मानवी मूल्यांची जपवणूक व संवर्धन करण्याची फार मोठी जबाबदारी शिक्षक म्हणून आपल्या सर्वांवर आहे, कारण या मूल्यांचे बीजारोपण जर आपण विद्यार्थ्यांवर योग्यपणे केले तर उद्याची सशक्त पिढी आपल्या हातून घडणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करुन अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे सर्वांगिण व्यक्तिमत्त्व अधिक कुशल पद्धतीने विकसित होण्यास मदत होईल व शिक्षकांना सुद्धा एक निकोप, सुदृढ व सम्यक विद्यार्थी घडविण्याचे समाधान प्राप्त होईल.

'पालि आलोको' इयत्ता अकरावीचे हे पाठ्यपुस्तक तुम्हाला निश्चितच आवडेल, अशी अपेक्षा आहे.

# पाठानुक्कमो


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| | **गज्जो विभागो** | |
| १) | सकनिरुत्ति अनुजानना | १ |
| २) | पुत्तसुत्तं | ४ |
| ३) | सत्तभरिया | ७ |
| ४) | बिजानं च खेत्तानं च कसिकम्मानञ्च वण्णना | १० |
| ५) | असोकस्स गिरनार सिलालेखा | १६ |
| ६) | लोकसुत्तं | १९ |
| ७) | चूळसेट्ठि जातकं | २२ |
| ८) | पजाहितदक्ख महारञ्ञो सयाजीरावो | २५ |
| | **पज्जो विभागो** | |
| १) | पुराभेदसुत्तं | २९ |
| २) | सुमनसुत्तं | ३२ |
| ३) | इन्दियसंवरसील | ३६ |
| ४) | मङ्गलसुत्तं | ४० |
| ५) | अङ्गुलिमाल भिक्खू | ४५ |
| ६) | सिविराजचरियं | ४९ |
| ७) | रोहिणी | ५३ |
| ८) | पकिण्णानि सुभासितानि | ५७ |
| | **थुलवाचन विभागो** | |
| १) | राजोवादजातकं | ६२ |
| २) | वासेट्ठसुत्तं | ६६ |
| | **परिसिट्ठ** | |
| १) | **व्याकरण** (वेय्याकरण) | ७० |
| २) | **सुलभ पालि** (सुलभो पालि) | ८४ |
| ३) | **निबंध** (निबन्धो) | ९० |
| ४) | **अपठित उतारे** (अपठितो) | ९० |
| ५) | **कथापूर्ती** (कथापुत्ति) | १०० |
| ६) | **पालि भाषेचे महत्त्व** | १०१ |
| | **तिपिटक ग्रंथ परिचय** | १०४ |